साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**<u>प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस</u>**

३४. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा रामचंद्र गार्डे माझे नात्याने चुलते होते ते आजरोजी हयात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे व माझ्या वडीलांचे संबंध चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा यांच्या हयातीत माझे तसेच माझ्या भावाचे त्यांच्याशी चांगले संबंध होते. तथापि मला कृष्णा यांची जन्मतारीख अथवा मृत्युची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा यांनी मला त्यांनी केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत पोष्टाद्वारे पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रतिज्ञापत्रात सदरचे मृत्युपत्र खोटे असल्याबाबत तसेच ते त्यांना मान्य नसल्याबाबतचा मजकुर नमुद होता व मी तो वाचला होता. साक्षीदार सांगतो की, तो खोटा होता. आता मला दस्त यादी नि.क्र.१०१/१ सह दाखल असलेल्या प्रतिज्ञापत्राची मुळ प्रत दाखवण्यात आली. त्यावर कृष्णा यांचा फोटो, पत्ता, अंगठा नमुद असुन त्यासह त्यांचे आधार कार्ड सुध्दा जोडलेले आहे. मी त्या सर्व बाबी ओळखतो. सदरील प्रतिज्ञापत्राची प्रत मला मिळाली होती व मी ती वाचली सुध्दा होती. मला त्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर का नमुद केलेला आहे याचे कारण सांगता येणार नाही.

३५. मी रामदास मानसिंग शिंदे यांना ओळखतो. त्यांच्याशी माझ्या वडीलांचे चांगले संबंध होते. माझ्या भावाचे देखील त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. आता मला दस्त यादी नि.क्र.१०१/२ वरील रामदास यांच्या प्रतिज्ञापत्राची मुळ प्रत दाखवण्यात आली. त्यावर रामदास यांचा फोटो, पत्ता, सही व अंगठा नमुद असुन त्यासह त्यांचे आधार कार्ड सुध्दा जोडलेले आहे. मी त्या सर्व बाबी ओळखतो. सदरील प्रतिज्ञापत्राची प्रत मला मिळाली होती व मी ती वाचली सुध्दा होती. मला त्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर का नमुद केलेला आहे याचे कारण सांगता येणार नाही. मी सदरील प्रतिज्ञापत्र वाचले असुन त्याबाबत माझी तक्रार नाही. सदरील प्रतिज्ञापत्रातील मजकुर वाचुन पाहिल्यानंतर मी त्याबाबत

रामदास यांना कुठलीही विचारणाा केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, रामदास मानसिंग शिंदे हयात आहेत. मी त्यांना साक्षीदार म्हणुन तपासु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, रामदास यांनी त्या प्रतिज्ञापत्रात मृत्युपत्राबाबत लिहलेला मजकुर त्यांच्या तसेच माझ्या दृष्टीने बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामदास यांचे माझ्याशी तसेच प्रतिवादी क्र.१ मंगल हिच्याशी देखील चांगले संबंध आहेत. मारुती गार्डे यांच्याशी रामदासची चांगली ओळख होती. हे म्हणणे खरे नाही की, मारुती गार्डे तसेच रामदास शिंदे यांना मृत्युपत्राबाबत कोणतीही माहीती नव्हती.

३६. कृष्णा रामा गार्डे हे सदरील मृत्युपत्रावरील साक्षीदार होते. आता मला नि.क्र.५७ वरील मृत्युपत्र दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये कृष्णा गार्डे यांच्या नावाचा उल्लेख साक्षीदार म्हणुन नाही. साक्षीदार सांगतो की कृष्णा गार्डे यांची सही व फोटो ओळखदार म्हणुन त्यात आहे. मी रामदास शिंदे यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात सदरील मृत्युपत्राबाबत उल्लेख केलेल्या मजकुराविषयी त्यांना विचारणा केली नव्हती. सदरचे मृत्युपत्र रामदास शिंदे यांच्या कडे कथीतरित्या ठेवले होते असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही तसेच सदरचे मृत्युपत्र मी रामदास यांच्याकडुन कथीतरित्या प्राप्त केले असे दर्शविणारा देखील कागदोपत्री तसेच इतर कुठलाही पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व रामदास यांचे कोणतेही वाद नसल्याने त्यांनी खोटे बोलण्याचे कुठलेही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा गार्डे यांच्या हयातीतच त्यांनी केलेल्या प्रतिज्ञापत्राबाबतची माहीती मला मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, कृष्णा गार्डे व रामदास शिंदे यांना मी त्यांच्या प्रतिज्ञापत्रांबाबत विचारणा केली नव्हती कारण मला सुध्दा सदरचे मृत्युपत्र खोटे आहे याविषयी पुर्वीपासुनच माहीती होती.

३७. मारुती गार्डे यांची पत्नी खाशीबाई यांचा मृत्यु दिनांक ३०.०८.२०१६ रोजी प्रतिवादी क्र.१ मंगल हिच्या घरी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, तिचे अंत्यविधी मंगलच्या मुलाने केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या अंत्यविधीला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावतील गावक-यांचे अंत्यविधी वाकेश्वर येथे होतात.

हे म्हणणे खरे आहे की, मी त्या ठिकाणी खाशीबाई हिच्या अंत्यविधीकरिता गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे इतर नातेवाईक मंगलच्या घरी अंत्यविधीकरिता गेलो होतो व तेथुनच आम्ही माघारी परतलो. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी मारुती गार्डे सुध्दा आमच्या सोबत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आम्ही सर्वजण भावकीतील मारुती गार्डे यांच्यासह तेथुन माघारी आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आम्ही कुणीही खाशीबाई हिच्या अंत्यविधीला, मातीला, सावडण्याच्या विधीला तसेच दशक्रियेला हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मारुती गार्डे यांची त्यांच्या पत्नीच्या त्या सर्व अंतीम कार्याकरिता हजर राहण्याची अतीव इच्छा असताना देखील मी व माझा भाऊ दिलीप याने त्यांना जबरदस्तीने आपल्यासोबत माघारी नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मारुती व खाशीबाई यांच्यात कोणत्याही कोर्ट केसेस नव्हत्या. नि.क्र.५७ वरील मृत्युपत्रात मारुती गार्डे यांनी खाशीबाई विषयी वाईट मजकुर लिहला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मारुती यांनी खाशीबाई यांच्या विरुध्द पोलीस तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, खाशीबाईने माझ्या वडीलां विरुध्द दावा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा माझ्या वडीलांनी मारुती गार्डे यांना फसवुण खरेदीपत्र केल्याबाबतचा होता. हे म्हणणे खरे आहे की, खाशीबाई व मारुती यांचे सांसारिक आयुष्य सुखाचे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, तसे असताना देखील माझ्या वडीलांना त्या दोघांनाही वेगळे राहण्यास भाग पाडले व त्यांच्यात भांडणे लावली. हे म्हणणे खरे आहे की, खाशीबाई हिने आमच्या विरुध्द दावा केल्याने तिच्या विषयी आमच्या मनात राग होता.

***प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.08.28 13:56:23 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- २८/०८/२०२५

*दुसरे* सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.